बीड । बुधवार
२१.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ५०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# राज्यात 10 दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज; काही जिल्ह्यांत अधिक प्रभाव?

**मुंबई । प्रतिनिधी**

कर्नाटक लगतच्या समुद्रात निर्माण होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम म्हणून हवामानात लक्षणीय बदल होणार आहेत.या बदलानुसार, बुधवार, गुरुवार आणि शुक्रवारी कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

मुंबईसह कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात ३१ मेपर्यंत मान्सूनपूर्व पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. २१ ते ३१ मे पर्यंत मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता आहे.

वळवाच्या वातावरणामुळे महाराष्ट्रात दिवसाचे कमाल तापमान आणि पहाटेचे किमान तापमान सरासरीच्या खालीच आहे. तापमान अशाच प्रकारचे राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड जिल्ह्यात पावसाचा अधिक प्रभाव राहील.

२७ हजार हेक्टरला फटका, पंचनामे करण्याचे आदेश- अवकाळीमुळे राज्यात २७ हजार हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. अमरावतीत १३ हजार, नाशिकमध्ये ५.८५० हेक्टर पिकांचे नुकसान

▶▶ उर्वरित पान २ वर




## अवकाळी पावसामुळे नुकसान..

मराठवाडयात आज, उद्या आणखी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. या भागाला अवकाळी पावसाचा मोठा फटका पडला आहे. तसेच जालना जिल्ह्यात दोन दिवसांत विज पडून चौघांचा मृत्यू,तीन जण गंभीर असल्याची माहिती देखील मिळाली आहे. लातूर,जालना, हिंगोली, छत्रपती जिल्ह्यात वीज पडून २६ जनावरांचा मृत्यू झाला आहे. अवकाळी पावसाचा मराठवाड्यात हजारो हेक्टरला तडाखा बसला आहे. एवढंच नव्हे तर शेकडो घरं,आणि गोठ्यावरील पत्रे गेली उडून गेली आहेत. अनेक ठिकाणी घरं आणि झाडांचीही पडझड झाली आहे. पती संभाजीनगर जिल्ह्यात शेकडो हेक्टरवरील आंबा,केळी, भाजीपाला पिकांना फटका बसला आहे. अंगावर झाड कोसळून पडून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. शेकडो झाडांची पडझड झाली आहे. अनेक ठिकाणी घरांचीही पडझड झाली. जालना जिल्ह्यात गेल्या २ दिवसात अंगावर वीज कोसळून भोकरदन तालुक्यातील ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३ जण जखमी झाले आहेत. जिल्ह्यात एकूण १० जनावरांचा मृत्यू झालाय. आंबा,केळी आणि भाजीपाला पिकांना फटका बसला आहे. लातूर जिल्ह्यातही शेतीपिकांना मोठा फटका बसलाय. आंबा फळबागांना फटका बसला आहे. तसेच कासार शिरशी या कांदा पिकवणाऱ्या भागात ५०० ते ६०० क्विंटल कांदा भिजून सडल्यानं हा कांदा फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. लातूरमध्ये वीज अंगावर पडून पशुधनाची मोठी हानी झाली आहे. दोन दिवसांत १९ जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर हिंगोली जिल्ह्यात देखील केळी,संत्रा,सूर्यफूल भाजीपाला उत्पादकांना फटका बसला. वीज पडून २ जनावरं दगावलीय.तसेच घरावर वीज पडून घराला तडे गेलेत. घरातील विद्युत साहित्य देखील जळण्याच्या घटना घडल्या आहेत.



*चि. सौ. का.निकिता दामोधर ईदगे व चि.नारायण गणेश नरनाळे यांच्या शुभ विवाह प्रसंगी शुभेच्छा देताना ईट चे सरपंच तथा माजी जिल्हा परिषद सदस्य गणपत अप्पा डोईफोडे, शाम मुळे सरपंच कांबी , दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय ननाळे, पांडुरंग डोईफोडे आदी मान्यवर उपस्थित होते.*

# बिंदुसरेच्या पुररेषेतील अतिक्रमण काढण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

## शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निदर्शनास आणून दिली बीडमधील गंभिर परिस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीपात्रात पुररेषेचे उल्लंघन करुन अतिक्रमण करण्यात आले आहे. यामुळे पावसात नदीला पुर आल्यानंतर मोठा धोका निर्माण होऊन जीवित हाणी होऊ शकते. ही गंभीर बाब शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून बिंदुसरा नदी लगतची पूररेषेतील अतिक्रमणे काढण्याचे आदेश



जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मुळूक यांच्या प्रयत्नामुळे बिंदुसरा नदीपात्र मोकळा श्वास घेईल आणि संभाव्य धोका टळणार आहे.

बीड शहराच्या हद्दीतून बिंदुसरा नदीपात्रातून ६ किलोमीटरचा प्रवाह वाहतो. पुरपरिस्थितीच्या काळात अनुचित घटना घडू नये या करीता पुररेषेच्या आत अतिक्रमण करण्यास बंदी आहे. मात्र बिंदुसरा नदीपात्रात पुररेषेच्या आत बेकायदेशीर अतिक्रमण करून जागा ताब्यात घेण्याचा प्रकार सर्रास सुरु आहे. पावसाळ्यात बिंदुसरा प्रकल्प

▶▶ उर्वरित पान २ वर

# सोशल मीडियावर जातीय पोस्ट करणाऱ्यांची खैर नाही

## गुन्हा दाखल करण्याचा बीड पोलिस अधीक्षकांचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये यापुढे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट लिहून जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांवर पोलिसांची नजर असणार आहे. अशा पोस्ट करणाऱ्यांवर यापुढे कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी दिला. जिल्हा पोलिस प्रमुखांनी





एक प्रसिद्धीपत्रक काढून हा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यातील सामाजिक सलोखा अबाधित राहण्यासाठी आता बीड पोलिसांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही काळात बीड जिल्ह्यातील नागरिकांकडून आक्षेपार्ह व्हिडीओ किंवा फोटो सोशल मीडियावर खात्री न करता पोस्ट ▶▶ उर्वरित पान २ वर

# इंदापुरातील श्री छत्रपती कारखान्यावर जाचक पर्व, विरोधकांचा सुपडा साफ, दादा मामा बापूंच्या पॅनलची एकहाती सत्ता

**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवारी १८ मे रोजी मतदान पार पडले होते सोमवारी १९ मे रोजी सकाळी नऊ वाजल्यापासून याची मतमोजणी सुरू झाली ती अखेर मंगळवारी पहाटेपर्यंत चालली.यात पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या निवडणुकीत पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष श्री जय भवानी माता पॅनलचे प्रमुख पृथ्वीराज जाचक यांच्या



नेतृत्वाखालील श्री जय भवानी माता पॅनलने विजय मिळवला असून दीर्घ प्रतीक्षेनंतर इंदापुरातील श्री छत्रपती कारखान्यावर जाचक पर्वाला सुरुवात झाली आहे.

तर या निवडणूक इंदापूरच्या पश्चिम पट्ट्यातील राजकारणातील दिग्गज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घोलप कुटुंबातील इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती करणसिंह घोलप यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर




# बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामाचा आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकाऱ्यांकडून शुभारंभ

### बीड शहरातील पाणी पातळीत होणार वाढ

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातून जाणाऱ्या बिंदू बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोली करण्याच्या कामाचा आमदार संदीप क्षीरसागर व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला असून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. बिंदुसरा नदीच्या खोलीकरणामुळे शहरातील पाणी पातळीत मोठी वाढ होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. बीड नगरपालिकेच्या वतीने, शहरात असलेल्या बिंदुसरा नदीपात्रात खोलीकरण ठाणे स्वच्छतेच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात करण्यात आली असून कामाचा शुभारंभ आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आमदार सय्यद सलीम, बीड नगरपालिकेच्या प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती होती.



### आ.क्षीरसागरांकडून तातडीने आर्थिक तरतूद

**बिंदुसरा नदीपात्राचे खोलीकरणाचे आणि स्वच्छता काम परिपूर्णतेने आणि प्रभावी व्हावे याकरिता जिल्हाधिकारी व प्रशासनाकडून आर्थिक तरतूदीचा विषय काढताच आ.संदीप क्षीरसागर यांनी स्वेच्छेने आपल्या स्थानिक विकास निधीतून २५ लक्ष रूपयांची तातडीने तरतूद केली.**

# पेपर रिकामा सोडा, तरीही 25 लाखांत तलाठी बनवतो; छ. संभाजीनगरातील दोघांचा कारनामा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

तलाठीच्या परीक्षेत पेपर नाही लिहिला तरी चालेल. आम्ही नंतर गुण वाढवून घेऊ, असे आमिष दाखवून मंगलमूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेच्या विशाल रामसिंग परदेशी (रा. एन-९) आणि रत्नाकर सुधाकर जोशी (रा.

सुदर्शन नगर, एन-११) यांनी तिघांची ६५ लाख रुपयांची फसवणूक केली. आर्थिक गुन्हे शाखेच्या चौकशीनंतर सिडको पोलिस ठाण्यात त्यांच्यावर नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला. शंकर पंडित दुसाने (६०, रा. आनंद पार्क, सिल्लोड) हे शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये त्यांची त्यांचे जावई भूषण विसपुते यांच्या माध्यमातून आरोपी जोशी व परदेशीसोबत ओळख झाली होती. तेव्हा दोघांनी त्यांच्या अनेक मोठ्या सरकारी अधिकाऱ्यांसोबत ओळख असल्याचे सांगून त्यांच्या दोन्ही मुलांना तलाठी करण्याचे स्वप्न दाखवले. त्यासाठी ५० लाख रुपयांची मागणी केली. मात्र, सदर ५० लाख जोशीच्या पतसंस्थेत संयुक्त नावे मुदत ठेव म्हणून ठेवण्यास सांगितले. नोकरीचे काम झाल्यावर मुदत ठेव

▶▶ उर्वरित पान २ वर

# दहशतवादाचा बुरखा फाडू : विश्वशांतीसाठी लढू

## २१ मे : दहशतवाद विरोधी दिन - संकल्प करू दहशत वादाचा खात्मा करण्याचा

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील भ्याड हल्ला कोणीही सच्चा भारतीय विसरू शकत नाही . २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रनांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे नष्ट केले.

माजी पंतप्रधान स्वर्गवासी राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे रोजी दहशतवाद विरोधी दिन पाळला जातो . २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे प्रचार करत असताना एलटीटीईच्या दहशतवाद्यांनी त्यांची हत्या केली . वयाच्या ४० व्या वर्षी शपथ घेतल्यानंतर राजीव गांधी भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान बनले . १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनी देशाचे सहावे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला . त्यांनी १९८४ ते १९८९ पर्यंत सेवा बजावली.

त्या दिवशी काय झाले : २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी एका रॅलीत सहभागी होण्यासाठी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे गेले . त्यांच्यासमोर एक महिला आली जी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम या दहशतवादी गटाची सदस्य होती . तिच्या कपड्यांखाली स्फोटकं होती आणि ती पंतप्रधानांकडे गेली आणि म्हणाली की तिला त्याच्या पायांना स्पर्श करायचा आहे. तिने पायाला स्पर्श करताच अचानक बॉम्बचा स्फोट झाला , त्यात पंतप्रधान आणि २५ जण जागीच ठार झाले .



दहशतवाद विरोधी दिन साजरा करण्यामागील उद्दिष्टे काय आहेत : शांती आणि मानवतेचा संदेश पसरवण्यासाठी दहशतवादी गटांबद्दल आणि ते दहशतवादी हल्ला करण्याच्या योजनांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे . लोकांमध्ये एकतेचे बीज पेरून लोकांमध्ये एकता वाढवणे तसेच , तरुणांना शिक्षण आणि प्रशिक्षण देणे . दहशतवाद , हिंसाचाराचा धोका आणि लोकांवर , समाजावर आणि संपूर्ण देशावर त्याचा धोकादायक परिणाम याबद्दल देशात जागरूकता निर्माण करणे.

दहशतवाद विरोधी दिवसाचे महत्त्व : शांतता आणि सौहार्द वाढवण्यासाठी दहशतवाद विरोधी दिन साजरा केला जातो . दहशतवाद्यांना निष्पाप लोकांचा विध्वंस करण्याची गरज वाटते कारण त्यांचे ब्रेनवॉश केले जाते , ते त्यांच्या धार्मिक हेतूसाठी किंवा त्यांना विवेक भ्रष्ट झाल्यामुळे ते मानतात. त्यांची प्रेरणा काहीही असली तरी त्यांची कामे अनैतिक आहेत हे नाकारता येणार नाही . हा दिवस आपल्याला हजारो सैनिक आणि पोलीस कर्मचार्यांनी आपल्या देशाचे आणि त्यांच्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी दहशतवादाविरुद्ध लढलेल्या बलिदानाचे स्मरण करण्यास मदत करतो.

दहशतवाद विरोधी दिनानिमित्त ही शपथ घेतली जाते : आम्ही भारतातील लोक , आपल्या देशाच्या अहिंसा आणि सहिष्णुतेच्या परंपरेवर दृढ विश्वास ठेवत , आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवाद आणि हिंसाचाराला तोंड देत खंबीरपणे उभे राहू , अशी शपथ घेतो . लोकांमध्ये शांतता , सामाजिक एकोपा आणि समजूतदारपणा राखण्याची आणि मानवी जीवनमूल्यांना धोका निर्माण करणाऱ्या विघटनकारी शक्तींविरुद्ध लढण्याची शपथ घेण्यात येते.

हा दिवस कसा साजरा केला जातो : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे दहशतवाद विरोधी दिनाच्या दिवशी निधन झाले, त्यामुळे या दिवशी अनेक ठिकाणी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येते. दहशतवाद आणि त्याचे दुष्परिणाम अधोरेखित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी रॅली काढून लोकांना जागृतीही केली जाते.

काही ऐतिहासिक दहशतवादी हल्ले : आजवर जगात अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत . त्यापैकी काही खालीलप्रमाणे :

१ ) अमेरिका, ११ सप्टेंबर २००१ चा हल्ला - ११ सप्टेंबर रोजी झालेल्या हल्ल्यात सर्व दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेच्या रूपात अल-कायदाने अमेरिकेवर लक्ष केंद्रित केले होते . मंगळवारी , ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यांमध्ये अंदाजे २९९६ लोक ठार , ६००० हून अधिक जखमी आणि १० अब्ज डॉलर्सहून अधिक किंमतीची संपत्ती व पायाभूत सुविधा नष्ट झाल्या.

२ )भारतीय संसदेवर हल्ला, १४ डिसेंबर २००१

भारतीय संसदेत १३ डिसेंबर २००१ च्या हिवाळी अधिवेशन सुरू असताना सकाळी अकरा वाजता पांढऱ्या राजदूताच्या कारमधून आलेल्या पाच सशस्त्र हल्लेखोरांनी संसदेवर गोळीबार केला. त्यानंतर झालेल्या प्रतिहल्ल्यात सर्व हल्लेखोर मरण पावले.

३ ) मुंबई दहशतवादी हल्ला , २६- २९ नोव्हेंबर २००८

ठिकाण - छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशन , लिओपोल्ड कॅफे , ताजमहाल पॅलेस आणि टॉवर हॉटेल , ओबेरॉय ट्रायडंट हॉटेल , मेट्रो सिनेमा , कामा आणि अल्बस हॉस्पिटल आणि नरिमन हाऊस . मुंबईत लष्कर-ए-तैयबा या अतिरेकी संघटनेशी संबंधित असलेल्या दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला करत १४४ माणसे ठार मारली . या हल्ल्यात नऊ बंदूकधारी ठार झाले आणि त्यातून एक जणाला पकडण्यात यश आले होते . नोव्हेंबर २०१२ मध्ये अंतिम बंदूकधारक मोहम्मद अजमल कसाब याला फाशी देण्यात आली. म्हणूनच , दहशतवाद विरोधी दिन हा संताप व्यक्त करतो आणि मानवतेशी एकता दर्शवितो . दहशतवाद म्हणजे दहशतवाद्यांच्या भयानक कृत्यांमुळे लोकांमध्ये जीवितहानी आणि मृत्यूची भीती निर्माण करण्याचे कृत्य आहे . यात शंका नाही की हा मानवांच्या हक्कांवर हल्ला आहे . म्हणून , आपण एकत्र येऊन प्रेम , काळजी इत्यादी पसरवून ते संपवले पाहिजे.

दहशतवाद्यांना कोणताही धर्म नसतो. त्यांना फक्त विनाशाची भाषा समजते असे म्हटले जाते ते बरोबर आहे .

राष्ट्रीय दहशतवाद विरोधी दिन हा भारतातील एक महत्त्वाचा दिवस आहे , लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सतर्क आणि सावध राहण्याचे आवाहन केले जाते . लोकांना त्यांच्यातील मतभेदांकडे दुर्लक्ष करून आणि सुसंवादीपणे सहअस्तित्वात राहण्यास प्रोत्साहित करून शांतता प्रस्थापित करतो . समाज शांत ठेवणे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव करून देतो .

२१ मे हा अंतरराष्ट्रीय चहा दिवस देखील आहे :- चहा हे केवळ लोकप्रिय पेय नाही तर अनेक समाजातील सामाजिक चालीरीती, समारंभ आणि आदरातिथ्य यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते . चहा उद्योग हा जगभरातील लाखो लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख स्रोत आहे , विशेषत: चहा उत्पादक भागात . आंतरराष्ट्रीय चहा दिनाचे चहा क्षेत्राचे आर्थिक मूल्य ओळखणे आणि शाश्वत चहा उत्पादन आणि न्याय्य व्यापार पद्धतींना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे .

पहिला आंतरराष्ट्रीय चहा दिवस २००५ मध्ये भारताची राजधानी नवी दिल्ली येथे साजरा करण्यात आला आणि नंतर इतर चहा उत्पादक देशांमध्ये - श्रीलंका, नेपाळ, व्हिएतनाम, इंडोनेशिया, बांगलादेश, केनिया, मलावी, मलेशिया, युगांडा आणि टांझानिया येथे साजरा करण्यात आला.

हिरवा आणि हर्बल चहा हा अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्सने समृद्ध असतो. एकूण आरोग्यावर आणि आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.



-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

पान ४ वरून पुढे...

### मोठेवाडी येथे...

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा , वृद्ध आई, मोठा भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने घरातील कर्ताच गेल्याने हे शेतकरी कुटूंब अक्षरशः खचले आहे. मृतक नरहरी यांच्यावर बँकेचे,लोकांचे देणे असल्यानेच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे समजते. याप्रकरणी मृतकाचा भाऊ विष्णु आत्माराम खेत्री यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माजलगांव ग्रामीण पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास बीट जमादार बाळु सोनवने व पोकॉ. गाविद बाबरे करीत आहेत.

### शिवसेना जिल्हाप्रमुख...

याचाच एक भाग म्हणजे आज बीड शहरातील बार्शीनका परिसरातील युवक मछिंद्र काळे, दिपक अंकुशे, परशुराम काळे, कृष्णा काळे, अनिल अंकुशे, सोनु रोकडे, दुसरा दीपक अंकुशे, करण अंकुशे, गोरख अंकुशे, पप्पु लोंढे, गणेश रोकडे, लखन काळे, अमोल लोंढे, मछिंद्र अंकुशे सह असंख्य युवकांनी प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, सतिशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, विशाल तांबे सह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

### अंशत: अनुदानित...

आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व विनाअनुदान आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीचा निर्णय आपणच घेतला आहे. काही कारणास्तव निधी उपलब्ध झालेला नाही ; परंतु येत्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळासह अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या भरीव अशा आर्थिक निधीची तरतूद करून वाढीव टप्प्याचे अनुदान मंजूर करून तुमचा प्रलंबित

पान ४ वरून पुढे...

राहिलेला प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ना. अजित पवार यांनी या वेळी सांगितले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेतच अजित पवार यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे. ना. अजित पवार यांना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष श्री. जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री.आत्माराम वाव्हळ सर, श्री.शिवप्रसाद शिरसाट सर, श्री. संजय देवा कुलकर्णी आदी बहुसंख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### पिंपरखेड विद्यालयाचा...

नसतानाही विद्यार्थ्यावर जीवापाड प्रेम करून त्यांना संस्काराने भरभरून विद्यादान देणारा, आपल्या बुलंद आवाजाने पिंपरखेड शाळेचा आवाज संपूर्ण बीड जिल्ह्यात निर्माण करणारा विद्यार्थीप्रिय शिक्षक दत्तात्रय जंगले यांच्या निधनामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पाण्याच्या धारा लागलेल्या आहेत. सन २००१ साली पिंपरखेड येथे जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय सुरू झाले. शाळेचा पहिल्या दिवशीच केवळ दोन शिक्षक उपस्थित होते त्यामध्ये सध्याचे मुख्याध्यापक विनोद लांबुड आणि सहशिक्षक दत्तात्रय जंगले हे होते. या दोघांनी शाळेचं नारळ फोडलं होते. अवघ्या पाच विद्यार्थ्यापासून सुरू झालेली शाळा आज साडेपाचशे विद्यार्थी पेक्षा जास्त संख्येवर जाऊन पोहोचले आहे. याचे सर्व श्रेय शाळेचे शिक्षक आणि त्यातली त्यात दत्तात्रय जंगले यांना जास्त प्रमाणात जातं. दत्तात्रय जंगले हे शाळेच्या पहिल्या दिवशी जरी शाळेत रुजू झालेले असले तरी त्यांच्यावर संस्थेकडून आणि प्रशासकीय व्यवस्थेकडून खूप मोठा अन्याय झाला त्यांचे शाळेत लवकर पद बसलं नाही आणि त्यामुळे त्यांना सुमारे वीस वर्ष बिन पगारी काम करावं लागलं. एक रुपयाही पगार नसताना

पान ४ वरून पुढे...

मोलमजुरी करून त्यांनी आपलं कुटुंब चालवलं. परंतु कधीही कोणापुढे गार्हान मांडलं नाही. अशा परिस्थितीमध्ये जीवन व्यतीत करत असतानाही त्यांनी विद्यार्थ्यांवरील त्यांच प्रेम कमी होऊन दिल नाही. विद्यार्थी आपला देव आहे. त्याची सेवा आपण देवा प्रमाणे केली तर एक दिवस फळ मिळेल या आशेवर त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची मन भरून सेवा केली. आपल्या उत्तम आवाजातून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केलं. शाळेच्या सर्व उपक्रमात त्यांनी वेळोवेळी सहभाग घेतला. आणि शाळेच्या उन्नतीसाठी वेळोवेळी जीवाचं रान केलं. आज पिंपरखेड सह शेजारील मोरेवाडी, कवडगाव, देवडी, राजा हरिश्चंद्र पिंपरी, चिंचोटी, साळींबा, मामला, बोरदेवी, नवापूर, यादव वस्ती आदी गावातील हजारो विद्यार्थी त्यांच्याकडून शिक्षण घेऊन यशस्वी झाले आहेत. आपल्या विद्यार्थ्यांवर कसं प्रेम करावे त्यांना कशा पद्धतीने माया लावावी आणि विद्यार्थ्यांना उन्नतीचा मंत्र कसा द्यावा हे जंगली सरांकडून शिकावं. त्यांचे निधन झाल्यामुळे पिंपरखेड गावासह परिसरातील अनेक गावात शोककळा पसरली आहे. मागील काही दिवसापासून त्यांना काविळीचा आजार झाला होता. योग्य उपचार न झाल्यामुळे त्यांचा त्यातच मृत्यू झाला. त्यांच्या निधनाची वार्ता समजतात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. आयुष्यभर बिन पगारी काम करून देखील विद्यार्थ्यांसाठी एवढ लळा लावणारे शिक्षक निघून गेल्यामुळे विद्यार्थ्यांच्या देखील डोळ्यात पाण्याच्या धारा लागलेल्या आहेत.

### अमृत संस्थेच्या...

'मेक इन इंडिया' तर निबंधाचा विषय 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' असेल. त्याचप्रमाणे, २१ ते ३० वर्षे वयोगटासाठी रांगोळीचा विषय 'माझी वसुंधरा' तर निबंधाचा विषय 'भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे' ठेवण्यात आला आहे. रांगोळी स्पर्धकांनी आवश्यक साहित्य स्वतः आणायचे आहे. प्रत्येक गटातून विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार असून, प्रथम क्रमांक ₹ २,०००, द्वितीय क्रमांक ₹ १,५०० आणि तृतीय क्रमांक ₹ १,००० असे आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले

पान ४ वरून पुढे...

आहे. या उपक्रमामधून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, अमृतच्या लक्षित गटातील युवकांमध्ये सृजनशीलता, देशभक्ती आणि सामाजिक भान निर्माण करण्याचा उद्देश आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी सौ. सीमा मनूरकर, सौ. सुमेधा मनसबदार, दीनदयाल शोध संस्थानचे संचालक श्री. गंगाधर देशमुख, विशाल जोशी - जिल्हा व्यवस्थापक, अमृत बीड, श्री. दिगंबर जोशी, श्री. सुमित धिरडे यांच्याशी संपर्क करावा.

### शिवणी विद्यालयात...

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उज्वल यशाबद्दल पालक व विद्यार्थी यांचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यालयातील जेष्ठ शिक्षक श्री.राऊत पी.के.यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार श्री.चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रमास पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.

### छत्रपती शिवाजी...

श्री.नागरे साहेब, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस कर्मचारी, सह शिवप्रेमी यांची उपस्थिती होती. नेकनूर शहरांमध्ये बऱ्याच वर्षापासून शिवप्रेमींची इच्छा होती की छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे ते त्यासाठी अजय काळे यांनी आमरण उपोषण केले होते आमरण उपोषणचा चौथा दिवस असल्याने नेकनूर सह पंचक्रोशी मध्ये ग्रामपंचायत विषयी रोष व्यक्त करताना शिवप्रेमी दिसून येत होते याच शिवप्रेमींची भावना लक्षात घेऊन नेकनूर ग्रामपंचायतने उपोषणकर्त्यांना एक महिन्याच्या कालावधीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बसवण्यासाठी जागा उपलब्ध करून देऊ असे लेखी स्वरूपात दिल्याने शिवप्रेमी यांचा रोष ग्रामपंचायत वरील कमी झाल्याचे दिसून आले.

पान १ वरून पुढे...

### राज्यात 10...

झाल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. लवकर पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

### बिंदुसरेच्या पुररेषेतील...

ओव्हर फ्लो झाल्यानंतर सर्व पाणी बीड शहरातून जाते. मुसळधार पावसामुळे बिंदुसरेला पुर आल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मात्र सध्या सहा किलोमीटर अंतराच्या या नदीपात्रातील पुर रेषेच्या आत नागरिकांनी अतिक्रमण केले असून ते धोकादायक आहे. पूररेषेच्या आत अतिक्रमण करणे हे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे. पावसाळा तोंडावर असून जोराचा पाऊस झाल्यावर बिंदुसरेला पुर येऊन मोठा धोका निर्माण होऊन जीवित हाणी होऊ शकते. ही गंभिर परिस्थिती मुळूक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. पावसाळ्याच्या अनुषंगाने संभाव्य धोका लक्षात घेऊन बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्राची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन पुररेषेच्या आतील अतिक्रमण काढण्यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड यांना आदेशित करावे अशी मागणी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निवेदनाद्वारे केली. निवदेनाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून बिंदुसरा नदी लगतची पूररेषेतील अतिक्रमणे काढण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

### सोशल मीडियावर...

केले जात आहेत. इतकंच नाही तर याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पान १ वरून पुढे...

जातीय रंग देणाऱ्यांवर कडक कारवाई करणार- या अशा सोशल मीडियावरील पोस्टमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊन त्यातून सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्यांवर सायबर पोलिसांकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. अशा आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुहे दाखल करून त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

तरुणांच्या टोळक्याची शिवराज दिवटेला मारहाण- बीड जिल्ह्यातल्या जलालपूर भागात एका शिवराज दिवटे या तरुणाला १० ते १२ जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. जलालपूरमध्ये धार्मिक कार्यक्रमात दोन गटात तुफान हाणामारी झाली. त्यात शिवराज दिवटे नावाच्या तरूणाला बेदम मारहाण करण्यात आली होती. मारहाण झालेल्या तरूणावर अंबाजोगाई शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान या प्रकरणी गुन्हा दाखल करत सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

समाधान मुंडेंकडूनही गुन्हा दाखल - बीडमधील परळीत समाधान मुंडे मारहाण प्रकरणी भागवत साबळे, सुरेश साबळेसह इतर आठ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाधान मुंडे हा शिवराज दिवटे मारहाण प्रकरणातील आरोपी आहे. मात्र समाधानलाच मारहाण झाल्याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परळीतील जलालपूर भागात समाधान मुंडेला मारहाण झाल्याची तक्रार समाधान मुंडेच्या आईने केली होती. त्यावरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाधान मुंडेला सात ते आठ जणांनी लाथा बुक्क्या आणि बेल्टने मारहाण केल्याची या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाचा अधिकचा तपास परळी शहर पोलिस करत आहेत.

पान १ वरून पुढे...

### इंदापुरातील श्री...

कोणाला किती मते ?

गट क्रमांक एक लासुर्णे मधून श्री जय भवानी माता पॅनेलचे पृथ्वीराज जाचक यांना ११६९४ मते मिळाली आहेत. तर शरद जामदार १०५२९ मते मिळाली आहेत. तर श्री छत्रपती बचाव पॅनलचे संजय निंबाळकर यांना ४८५० तर प्रताप पवार यांना ४१९७ मते मिळाली आहेत.

गट क्रमांक दोन सणसर मध्ये श्री जय भवानी माता पॅनेलचे रामचंद्र निंबाळकर यांना १०९२९ मते मिळाली तर शिवाजी निंबाळकर यांना १०४३१ मते मिळाली.विरोधी संग्राम निंबाळकर यांना ५१६५ मते मिळाली तर महादेव शिरसाट यांना ३९५७ मते मिळाली. तर उद्धट गटामधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार पृथ्वीराज श्रीनिवास घोलप यांना ९६७२ मते मिळाली तर गणपत सोपान कदम यांना ९२९७ मते मिळाली. तर या गटात मात्र घोलप यांना मोठा फटका बसला आहे. इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती करणसिंह घोलप हे श्री छत्रपती बचाव पॅनल मधून मैदानात होते त्यांना ६९६१ मते मिळाली आहेत. तर भाजपचे नेते तानाजीराव थोरात यांना ४७२१ मते मिळाली आहेत.

यात सोबत अंथुर्णे गटामधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार प्रशांत दासा दराडे यांना १११८० मते मिळाली आहेत तर अजित नरुटे यांना ११ हजार ९० मते मिळाली आहेत. विरोधी पॅनलचे श्री छत्रपती बचाव मधून मैदानात असलेले बाबासाहेब झगडे यांना ४९४० मते तर राजेंद्र पाटील यांना ४८६० मते मिळाली आहेत.गट क्रमांक पाच सोनगाव मधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार अनिल सिताराम काटे यांना ११ हजार ७८९ मते मिळाली आहेत तर बाळासाहेब कोळेकर यांना ११,७६८ मते मिळाले आहेत. तर संतोष मासाळ यांना १० हजार तीनशे सात मते मिळाली आहेत.याच गटात विरोधी असलेले श्री छत्रपती बचाव पॅनलचे उमेदवार

पान १ वरून पुढे...

रवींद्र टकले यांना ५४८२ मते मिळाली आहेत. तर गुणवडी गटामध्ये श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार कैलास गावडे यांना ११८३२ मते मिळाली. तर निलेश टिळेकर यांना ११,५६३ मते आणि सतीश देवकाते यांना ११,२६१ मते मिळाले आहेत तर विरोधी असणारे नितीन काटे यांना ५४३४ मते मिळाले आहेत.

### पेपर रिकामा....

थांबवून पैसे त्यांना देण्याचे ठरते. दुसाने यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवत दोघांच्या नावे ५० लाखांची एफडी केली. नोकरीचे काम झाल्याशिवाय एफडी मोडणार नाही, असेही आरोपींनी आश्वासन दिले. जानेवारी २०२४ मध्ये तलाठी परीक्षेचा निकाल लागला. मात्र पहिल्या दोन्ही यादीत दुसाने यांच्या मुलाचे नाव नव्हते.

नंतर गुण वाढवून घेऊ-* जोशी व परदेशी दोघांनी दुसाने यांच्या मुलांना तलाठ्याच्या परीक्षेत उत्तर येत असलेले प्रश्न लिहा, बाकी आम्ही अधिकाऱ्यांकडून वाढवून घेऊ, असेही सांगितले. शिवाय तुमच्यासारख्याच आणखी २२ मुलांना आम्ही तलाठी करणार असल्याचे सांगितले. मात्र निकालानंतर दोन्ही मुलांचा निकाल अनुत्तीर्ण लागला. दुसाने यांनी त्यांना याबाबत विचारणा केल्यावर आरोपींनी मुंबईतील अधिकाऱ्यांना पैसे दिले आहे, ते परत घेऊन देतो, असे आश्वासन दिले. मात्र शेवटपर्यंत पैसे दिलेच नाही. आरोपींनी एफडी परस्पर मोडून पैसे घेतले

दुसाने यांना संशय आल्याने त्यांनी पतसंस्थेत जाऊन चोकशी केली. त्यात आरोपींनी त्यांची ५० लाखांची एफडी परस्पर मोडून पैसे काढून घेतल्याचे समजले. त्यांच्याप्रमाणेच श्रीकांत पाखरे यांच्या मुलाला तलाठी बनवण्याचे आमिष दाखवून त्यांनी १५ लाख उकळले. सिडको पोलिसांना दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू असल्याचे निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी सांगितले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महाराष्ट्रातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ, पुण्यातही सापडला रुग्ण; सरकार घेणार मोठा निर्णय ?

**मुंबई । प्रतिनिधी**

कोरोनाचे मुंबईत ५६ रुग्ण सक्रिय आहेत. हे सर्व रुग्ण मुंबई महापालिकेच्या हद्दीतील आहेत, तर राज्यातील इतर जिल्ह्यांपैकी केवळ पुण्यात नव्याने रुग्ण आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मुंबईपाठोपाठ पुण्यातही कोरोनाचा पहिला रुग्ण आढळून आला आहे. पुण्यातील ८७ वर्षीय वृद्धाला कोरोनाची लागण झाली आहे. मुंबईनंतर आता पुण्यातही कोरोनाचा शिरकाव झाला असून शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ८७ वर्षीय पुरुषाला कोरोना विषाणूची लागण झाल्याचे समोर आलं आहे. यंदाच्या वर्षातील पुण्यातील हा पहिलाच रुग्ण असल्याने आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.



मे महिन्यात रुग्णसंख्येत किंचित वाढ- या वर्षी जानेवारीपासून आतापर्यंत कोरोनाचे ८७ रुग्ण आढळले होते. त्यापैकी ३१ बरे झाल्याने सध्या ५६ जणांवर घरीच उपचार सुरू आहेत. सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. परंतु, महाराष्ट्रात सध्या ५७ रुग्ण सक्रिय असून, यापैकी केवळ एक रुग्ण पुण्यात असून उर्वरित सर्व रुग्ण राजधानी मुंबईत आहेत. त्यामध्ये मे महिन्यात किंचित वाढ झाली असली, तरी ती संख्या एखाद्या ठिकाणावरून नसून, विखुरलेल्या स्वरूपातील आहे, असेही आरोग्य खात्याने स्पष्ट केले आहे.

घाबरून जाण्याचे कारण नाही- कोरोना विषाणू सध्याचा सौम्य स्वरूपाचा उपप्रकार असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. याआधी जानेवारीत दोन, फेब्रुवारीमध्ये एक आणि एप्रिलमध्ये चार रुग्णांचे निदान झाले होते. मार्चमध्ये एकही कोरोना रुग्ण आढळून आला नव्हता.

या वर्षी कोरोनाने एकाही रुग्णाचा मृत्यू नाही- आरोग्य विभागाने सोमवारी ४६ चाचण्या केल्या. त्यापैकी आरटीपीसीआर चाचण्यांची संख्या १५ होती, तर रॅपिड चाचण्यांची संख्या ३१ होती. दरम्यान, २०२४ मध्ये चार लाख ८४ हजार ३५२ कोरोना तपासण्या केल्या होत्या. त्यापैकी पाच हजार ५२८ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले असून, त्यापैकी ३५ रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद केली आहे. मात्र, या वर्षी कोरोनाने एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नाही.

मंत्रिमंडळ बैठकीत मोठ्या निर्णयाची शक्यता- राज्यमंत्रिमंडळाची सकाळी ११.३० वाजता मंत्रालय येथे बैठक होणार आहे. पुण्यात करोनाचा रुग्ण आढळल्याने मंत्रिमंडळ बैठकीत यावर निर्णय घेण्याची शक्यता आहे. तसेच राज्यात अवकाळी पावसाने शेतीमालाचे नुकसान झाले आहे. यावरही शेतक-यांना मदत करण्याबाबत निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्राबरोबरच तामिळनाडू आणि केरळमध्येही कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचं दिसून येत आहे.

## 'एमपीएससी'कडून निकाल जाहीर, 'कट ऑफ'ने मोडले सर्व विक्रम

**नागपूर । प्रतिनिधी**




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) दिरंगाई धोरणामुळे जवळपास परीक्षा देणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४' होऊन ४ मार्चला अंतिम उत्तरतालिका जाहीर करण्यात आली. मात्र, दीड महिने निकाल थांबवून ठेवला होता. शेवटी आयोगाने सोमवारी रात्री निकाल जाहीर केला. विशेष म्हणजे, आयोगाचे अध्यक्ष आणि सचिव कुणीही यावर प्रतिक्रियाही देत नसल्याने विद्यार्थी संतप्त झाले होते. परंतु, या परीक्षेतील विशेषता म्हणजे परीक्षेने 'कट ऑफ'चे सर्व विक्रम मोडले आहेत. यावर्षी खुल्या वर्गाचा 'कट ऑफ' ६२.५० टक्के आहे. तर अनुसूचित जातीचा 'कट ऑफ' ६१.५०, ओबीसीचा ६२.५० इतका आहे. यापूर्वीच्या परीक्षेमध्ये इतका 'कट ऑफ' कधीच नव्हता अशी माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतरही 'एमपीएससी'चे वेळापत्रक विस्कळीतच आहे. संयुक्त पूर्व परीक्षेचा निकाल रखडल्याने समाज माध्यमात आयोगाच्या कार्यपद्धतीवर टीका होत आहे. तसेच आयोगाच्या सचिवांविरोधातही उघडपणे नाराजी व्यक्त केली जात आहे. विलंबाने जाहीर होणारे निकाल, परीक्षेच्या तारखा जाहीर न होणे, अनेक वर्षे विद्यार्थ्यांना एकच परीक्षा देत राहावी लागणे, अशा अनेक तक्रारींचा पाऊस समाज माध्यमांवर पडत आहे. संयुक्त पूर्व परीक्षेअंतर्गत सहायक कक्ष अधिकारी (५४ पदे), राज्य कर निरीक्षक (२०९ पदे) आणि पोलीस उपनिरीक्षक (२१६ पदे) अशा ४७९ पदांसाठी ही भरतीप्रक्रिया राबवली जात आहे.

# राजेगावचे नाव लौकिक करणाऱ्या गावकऱ्यांचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा करण्यात आला सत्कार

### राजेगाव राबवणार लेक लाडकी योजना ; राजेगावत जन्मलेल्या मुलींच्या नावे ५ हजार रुपये ग्रामपंचायत करणार फिक्स डिपॉझिट
### लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी सुरू केलेली चळवळ पुढे नेण्यासाठी लेक लाडकी ही योजना राबवत आहोत - डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील केज तालुक्यातील राजेगाव या ठिकाणी औद्योगिक, व्यापारी, नौकरी, शासकीय, निम शासकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मंचावर उपस्थित असलेल्या शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी सुरू केलेली चळवळ पुढे घेऊन जाण्याकरिता राजेगावात जन्मलेल्या मुलीच्या नावे ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्याची घोषणा केली याला राजेगाव ग्रामपंचायतिने सहमती दर्शवली असून आता राजेगावात जन्माला येणाऱ्या मुलींच्या नावे ग्राम पंचायतच्या वतीने पाच हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. याकरिता लागणाऱ्या निधी करिता डॉ. ज्योती मेटे यांनी ग्रामपंचायतीकडे धनादेश सुपूर्त केला आहे.

राजेगाव ता.केज जि. बीड या ठिकाणी औद्योगिक, व्यापारी, नौकरी, शासकीय, निमशासकीय क्षेत्रातीलविध क्षेत्रात आणि दहावी, बारावी परीक्षेत गावाचे नाव उंच शिखरावर पोहोचविणाऱ्या मान्यवरांचा आणि विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला यावेळी महामानव आणि लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर सध्या कमी होत असलेल्या मुलींचा जन्मदर लक्षात घेता लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात मुलींचा जन्मदर वाढवा याकरिता अजित बालिका योजना सुरू



केली होती त्यांचे हे कार्य पुढे नेण्यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे जन्म गाव असलेल्या राजेगाव येथून मुलींचा जन्मदर वाढवा याकरिता लेक लाडकी ही योजना सुरू करण्यात आली आहे. यात आता गावात जन्मलेल्या मुलींच्या नावे ग्रामपंचायतच्या वतीने ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. याकरिता लागणाऱ्या निधीसाठी डॉ. ज्योती मेटे पुढे सरसावल्या असून त्यांनी ग्रामपंचायतीकडे निधीचा धनादेश सोपवला आहे.याप्रसंगी बोलताना डॉ.ज्योती मेटे म्हणाले की लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या निधनानंतर एक गोष्ट मनाशी खुणगाठ बांधली होती या पुढच्या काळामध्ये जो काही पत्नी धर्म आहे. तो निभावत असताना साहेबांना प्रिय असणारी प्रत्येक गोष्ट करायची आणि त्याचाच परिपाक म्हणून त्यांनी मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी सुरू केलेली चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी राजेगाव या त्यांच्या जन्म गावापासून लेक लाडकी या योजनेची सुरुवात करत आहोत. असे मत त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश सरचिटणीस नितीन लाठकर, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, आशुतोष मेटे, सरपंच प्रवीण मेटे, लिंबराज वाघ ,डॉ. मनीषा मेटे, डॉ. जयेश दळे, डॉ. अशोक मुंडे, राजकुमार मेटे, युवराज कदम, प्रा. विठ्ठलराव फाटक , प्रा. योगीराज बापू मेटे, राजकुमार मेटे, प्रा. वैशाली मेटे ,शाळेतील मुख्याध्यापिका श्रीमती मोराळे आदीसह मोठ्या संख्येने गावकरी विद्यार्थी उपस्थित होते.

## वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय

**मुंबई । प्रतिनिधी**

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करणे, त्यासाठीची आवश्यक पदे उपलब्ध करून देणे आणि येणाऱ्या खर्चास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडून शासनास सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या न्यायालयाकरिता २३ नियमित पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे पाच पदांच्या सेवा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. यापोटी येणाऱ्या एकूण रूपये १,७६,४२,८१६/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर)- एक, अधीक्षक-एक, सहायक अधीक्षक-दोन, लघुलेखक श्रेणी-२-एक, वरिष्ठ लिपिक-तीन, कनिष्ठ लिपिक-नऊ, बेलीफ-तीन, शिपाई-तीन, पहारेकरी-एक, सफाईगार-एक अशा पदांना मान्यता देण्यात आली.

## सरन्यायाधीश भूषण गवई प्रोटोकॉल प्रकरणी जनहित याचिका दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्रात आले होते. मात्र, या दौऱ्यादरम्यान त्यांना महाराष्ट्र शासनाकडून व्हीआयपी प्रोटोकॉल न देण्याच्या कथित घटनेमुळे मोठा वाद निर्माण



झाला आहे. याच मुद्द्यावर ॲड. नितीन सातपुते यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. न्या. भूषण गवई. हे महाराष्ट्रातील अमरावती इथले मूळ रहिवाशी आहेत. त्यांनी नुकतीच भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. त्यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातून प्रथमच दलित समाजातील व्यक्ती देशाच्या सर्वोच्च न्यायिक पदावर विराजमान झाली. ज्यामुळे राज्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. न्या. गवई यांनी आपल्या कार्यकाळात कलम ३७०, नोटबंदी आणि इलेक्टोरल बाँड यासारख्या महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये ऐतिहासिक निर्णय दिले आहेत. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने न्या. गवई यांच्या सन्मानार्थ एका सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. या समारंभादरम्यान न्या. गवई यांनी स्वतः जाहीरपणे खंत व्यक्त केली की, त्यांना महाराष्ट्र शासनाकडून योग्य व्हीआयपी प्रोटोकॉल देण्यात आला नाही.

# आईची आई बीजांड ते ब्रह्मांड

वयोपरत्वे तोल जाऊन पडल्याने आई अंथरुणाला खिळली ती कायमचीच. सर्व अवयव नव्वदीतले. झिजलेल्या कंबरेवरचा मुकामार तिला कायमचा परावलंबी करून गेला. पाय उचलणं सुद्धा अशक्य झालं.तिच्या संवेदना कमी झाल्याने सगळे सोपस्कारही कपड्यातच. वृद्धत्व सोडून दुसरा आजार नव्हता.

पण म्हातारपण म्हणजे सुकून जीर्ण झालेलं बालपण. तोच हटवाद आणि वागणंही तसंच लहरी. सल्ला मसलतींचा पाउस पडला. लाख मोलाच्या आईसाठी काही हजाराची केअरटेकर... मनाला पटेना.

अनेक पर्यायांचा उहापोह झाला. आम्हा दोघांची कामं अत्यावश्यक सेवेतली. सलग सुट्ट्यांचा दुष्काळ. मग मीच ठरवलं केअरटेकर व्हायचं. चिडक्या हट्टी म्हातारबाळाची आई व्हायचं.

लाळेरं लावून सकाळी चमच्याने पाजलेला चहा. दमदाटी करत भरवलेलेचे चिऊ काऊ चे घास. कधी ठसका, कधी मळमळ तर कधी उलटी... बहाणेच बहाणे.

पेशाने सर्जन, मलमूत्र रोगांशी जुनी दोस्ती. त्यामुळे संकोच सोडणं सोपं गेलं. डोळे मिटून घेण्याशिवाय तिच्या संकोचाला पर्यायच नव्हता.

वेळोवेळी डायपर बदलून, अंग पुसून, पावडर लावून कपडे घालण्यापासून तेल लावून वेणी फणी करण्यापर्यंत सगळं. दिवसातून दोन तीनदा घर ते हॉस्पिटल. हॉस्पिटल ते घर अप-डाऊन. धावपळ होत होती ; पण थकवा आला तरी जाणवत नव्हता.

तिच्या प्रत्येक हाकेमुळे मनातल्या मनात माझाही पान्हा फुटत असावा. मनाच्या कुठल्यातरी पातळीवर कधीही न मिळालेलं समाधान अनुभवत होतो.

कुठल्याही कळा न सोसता मला तिचं आईपण मिळालं हे माझं किती मोठं भाग्य होतं.

पण फार काळ नाही.

काही महिन्यांची सेवा आणि एका प्रसन्न सकाळी माझ्या हिरकणी ने गड सोडला.

मी माझं कर्तव्य समजून तिची सेवा केली. कुणीतरी म्हणालं पुण्य कमावलंस. त्यांचं खरं असेल तर हे छोटंसं पुण्य चित्रगुप्ताच्या डायरीतील माझं पान भरायला पुरेसं होईल.

देव आणि आई एकाच नाण्याच्या दोन बाजू. देव खाली येऊ शकत नाही म्हणून आईला पृथ्वी वर पाठवलं। असं कुठंतरी वाचलेलं. त्या वाक्याचा प्रत्यय यावा अशी आपली आई.

रामची असो की शामची.

कैकयी असो की गांधारी.

आई सगळ्यांची सारखीच.

शरीराने आणि मनाने आपल्या गूढ देवराई तील शक्ति देवता. फक्त आपल्या भल्यासाठीच तिच्या ओंजळीतली माया रिकामी करणारी लक्ष्मी.

प्रत्येकाच्या छोट्याशा आकाशातील अढळ स्थानावरील ध्रुवतारा. तिचं गुरुत्वाकर्षण तर पृथ्वीपेक्षाही भारी. खालून वर नेणारं.

बिजांडातून ब्रम्हांडात पोहचवणारं.

तिच्या बिजांडात अंकुरलेला सूक्ष्म कोंब म्हणजे आपण. एक दशांश मि.मि.पेक्षाही लहान. गर्भाशयाच्या भिंतीवर मुळं पसरून, तिचंच रक्त शोषून तगणारं बांडगुळ.

मधेच केव्हातरी पारंबी फुटावी तशी नाळ फुटते बेंबीतून. त्यातून मिळणाऱ्या खतावर कोंबाचं रोपटं होण्याची सुरूवात होते.

चैत्राच्या पालवी सारखे हळुहळू फुटलेले कोवळे कोवळे अवयव. तिचीच उर्जा घेऊन सुरू झालेली इंजिनं... आदिपासून अंतापर्यंत अव्याहत पळणारी.

नव्या फुफ्फुसाचा पहिला श्वास आणि नव्या ह्रदयाचा पहिला ठोका तिच्याच मालकीचा. नॅनोग्रॅम पासून ते किलोग्राम पर्यंतची वाढही तिच्याच कोठारातील.

कणाकणानं वाढणारं ओझं घेऊन तोल सांभाळणारा कणखर मणका. कितीही वाकला तरी पोटातल्या गोळ्याला सुरक्षित वाहणारा. लाथा मारणारं बाळ, आणि लाथा मारणारी परिस्थिती, दोघांना झेलत



तारेवर झुलणारी डोंबारीण.

नऊ महिने नऊ दिवसांची कसरत. ढोलकं बडवायला नवरा आणि टाळ्या पिटायला ढिगभर जमाव. पण मदतीसाठी थाळी फिरवली की सगळ्यांचं घुमजाव. बाळनिवासाच्या पायाभरणीत फिक्कट करणारे दिवस.

धापा टाकत टाकत केलेलं रांधा वाढा, उष्टी काढा. सुजून जडावलेले पाय आणि वाढलेले श्वास म्हणजे घटिका भरल्याची नांदीच. चंद्र, ग्रह, तारे बाळाच्या कुंडलीत स्थिरावले, की सुरू झालेल्या प्रसव कळा.

खोल, गूढ,अगम्य कृष्ण विवरातील वादळ. सुरुवातीला समुद्राच्या हळुवार लहरींचे हिंदोळे. नंतर याच लहरींवर स्वार झालेल्या भरतीच्या धडका. एकामागून एक. बाळाच्या ओढीने वाढलेल्या कळा जणू चंद्रासाठी उसळणाऱ्या पौर्णिमेच्या लाटा. काही सौम्य काही रौद्र. उरल्या सुरल्या शक्तीला मुठीत घट्ट आवळून घेतलेल्या, कळांवर कळा...

प्राण पुरवणारा वार जागा सोडण्यासाठी भिंतीपासून विलगू लागतो. मुळापासून विस्थापित होण्याच्या भितीने बाळही अस्वस्थ होऊ लागते. अशुभ संकेतांची टिटव्यांची टिवटिव. गुदमरणाऱ्या बाळासाठी, खचलेला धीर मुठीत आवळून एक जोराची किंकाळी आणि निकराची एक शक्तिशाली कळ.

किनारा चिरणाऱ्या पाण्याच्या लोंढयात तरंगत आलेलं आणि दाईने झेललेलं गोंडस बाळ.

मातेने सोसलेल्या यातनांना बाळाने रडून दिलेली दाद, म्हणजे बाहेरच्या जगातला पहिला श्वास. दुपट्यातल्या सुखाला उराशी कवटाळून अमृतकुंभाला शोधणाऱ्या अधाशी ओठांना कौतुकाने पाहणारे आईचे डोळे.

फुटलेल्या पान्ह्यातून गळणारे थेंब वेदनांचा निचरा करत बाळाच्या ओठांवर विसावले की, अमृताच्या अभिषेकात न्हाऊन तिच्या काळजाचा तुकडा झोपी जातो.

माता कुराणातील असो वा पुराणातील. तिचं वात्सल्य कुणालाही नतमस्तक करणारं. अनसूया असो की अदिति दिगंबराची असो किंवा पैगंबराची.

आई शेवटी आईच असते.

जन्माला आलेल्या बाळासाठी तिचं त्याचं नातं अद्वैत. तिने शून्य बॅलन्स वापरून उधळलेली अनमोल ममता. त्यामुळे त्याच्या उत्पन्नात वाढणारा प्रत्येक मोठा आकडा तिच्या ममतेशी गुणला की शून्यच.

जगभर फिरला, पण तिच्या उपकारांची परतफेड करणाऱ्या वस्तूंचा मॉल नाही दिसला.

डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, पास बुकं हे या नात्यात फक्त कागद आहेत. आईचं कर्ज फेडण्या इतका त्यात बॅलन्स कुठे आहे ?

या ओझ्यातून किंचित मुक्त होण्याचा एक मार्ग... एक उतराई... शक्य असेल तर जरूर बना.. आईची आई..

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.२१ मे २०२५ पान ४

## मोठेवाडी येथे कर्जाला कंटाळून आत्महत्या



**माजलगाव । प्रतिनिधी**

वाढत्या कर्जाच्या डोंगराला कंटाळून ४५ वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना १९ मे सोमवार रोजी मोठेवाडी येथे घडली. नरहरी आत्माराम खेत्री असे मृतकाचे नाव आहे. मोठेवाडी येथील नरहरी आत्माराम खेत्री १९ मे सोमवार रोजी सकाळी शेतातुन येतो असे घरातील लोकांना सांगून निघून गेले होते. बराच वेळ झाला तरी घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता एका शेतात जाऊन विष प्राशन करून बेशुद्ध अवस्थेत ते आढळले. ते घरातील कर्ते होते. ▶▶ उर्वरित पान २ वर

# धाड, धाड... पुण्यात शिवसेना जिल्हाप्रमुखावर गोळीबार

**पुणे । प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांपासून राज्यात खून, दरोडे, मारामाऱ्यांचे सत्र सुरु आहे. अशातच आता पुण्यामधून एक मोठी बातमी समोर आली असून शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर गोळीबार करण्यात आला आहे. या भयंकर घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. सुदैवाने यामध्ये कोणीही जखमी झाले नाही.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पुण्यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर गोळीबार करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. शिंदे गटाचे युवासेना जिल्हाप्रमुख निलेश घारेवर गोळीबार करण्यात आला. पुण्यातील गणपती माथा परिसरात हा प्रकार घडला असून यामध्ये कोणीही जखमी झाले नाही. निलेश घारे हे गणपती माथा येथील जनसंपर्क कार्यालयात सहकाऱ्यांसोबत उपस्थित होते, त्याचवेळी बाहेर पार्क केलेल्या त्यांच्या गाडीवर हल्ला झाला. दुचाकीवरून आलेल्या दोघांकडून घारे यांच्या गाडीवर गोळ्या झाडण्यात आल्या. सुदैवाने या हल्ल्यामध्ये निलेश घारे यांना कोणतीही इजा झाली नाही. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

दुसरीकडे, वर्ध्यामधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. वर्धाच्या देवळी पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या खर्डा शिवारात वर्धा नदीच्या पात्रात तांबा (येंडे) येथील गोपाळ उर्फ गोलू धनराज कुंभारे (वय २८) याचा मृतदेह आढळून आला. सुरूवातीला या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. मात्र सखोल चौकशीत गोपाळ याची हत्या करून त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने नदीत फेकण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे... या प्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आरोपींनी रक्ताने माखलेले त्यांचे कपडे जाळून नष्ट केल्याचेही पोलिसांच्या चौकशीत पुढे आले आहे.

## शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन असंख्य तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारून आज उल्हास गिराम यांच्या पक्ष कार्यास दोन महिने पुर्ण होत आहेत. त्यांची विचारसरणी, सामान्य लोकांच्या गरजाशी निगडित आंदोलने याला प्रभावित होऊन बीड शहरातील बार्शीनाका परिसरातील असंख्य तरुणांनी उल्हास गिराम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.



शिवसेना पक्षफुटी नंतर बीड जिल्यातील शिवसैनिक बॅकफुट आला होता. जिल्हाप्रमुख म्हणून उल्हास गिराम यांनी जबाबदारीचे भान ठेऊन जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधून सामान्य शिवसैनिकांत उत्साह निर्माण केला. सामान्य जनता ज्या छोट छोटया समस्यानी ग्रासली आहे, हे हेरून आंदोलने उभारली.

उल्हास गिराम यांच्या याच कार्यपद्धतीला प्रभावित होऊन आज शेकडो तरुण पक्ष प्रवेशा संदर्भात विचारणा करत आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर



*मुंबई ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांनी आज राजभवन येथे कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली. यावेळी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे समाधान जेजुरकर, सदानंद मंडलिक आदी दिसत आहेत.*

## अंशत: अनुदानित शाळा टप्पा वाढीची अंमलबजावणी पावसाळी अधिवेशनात -उपमुख्यमंत्री अजित पवार

### बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे अजित पवार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

१४ ऑक्टोबर २०२४ च्या विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून येत्या पावसाळी अधिवेशनात भरीव आर्थिक निधीची तरतूद करून आमचा प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाला दिले.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार हे काल दि.१९ मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## पिंपरखेड विद्यालयाचा बुलंद आवाज काळाच्या पडद्याआड शिक्षक दत्तात्रय जंगले यांच्या निधनामुळे तालुक्यात हळहळ

### घरची हालकीची परिस्थिती असतानाही बिनपगारी केली नोकरी; विद्यार्थ्यांना देव मानून जीवनभर केली विद्यार्थ्यांची सेवा अपंगत्वावर मात करून शाळेच्या सर्व उपक्रमात घेतला भाग; विद्यार्थ्यांवर माया लावल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यात पाणी

**वडवणी । प्रतिनिधी**

अगदी पिंपरखेड शाळेच्या पहिल्या दिवसापासून शाळेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असलेले दत्तात्रय जंगले सर यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झालं. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच पिंपरखेड आणि परिसरातील अनेक गावात शोककळा पसरली. सलग वीस वर्ष एक रुपयाही पगार ▶▶ उर्वरित पान २ वर



### आर्थिक मदतीचे आवाहन

दत्तात्रय जंगले सर यांनी बिन पगारी काम केलं त्यांच्या कुटुंबीयांना मोलमजुरी करून जीवन व्यतीत कराव लागलं. अशा परिस्थितीत आता थोडेशी पगार चालू झाली असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचं कुटुंब आज उघड्यावर पडले आहे. त्यांच्या कुटुंबाला आधाराची गरज आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचा फोन पे नंबर ९४२१९५४४७६ यावर आपापली मदत टाकावी असे आवाहन काही विद्यार्थ्यांनी केले आहे.

## अमृत संस्थेच्या वतीने सावरकर जयंतीनिमित्त अमृतच्या लक्षित गटासाठी २२ मे रोजी जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त 'अमृत'च्या लक्षित गटातील युवक-युवतींसाठी भव्य जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)' या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने आणि 'दीनदयाल शोध संस्थान' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत.

ही स्पर्धा गुरुवार, २२ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत जनशिक्षण संस्था, पांगरी रोड, बीड येथे होणार आहे. या स्पर्धेत फक्त अमृतच्या लक्षित गटातील १२ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींनाच सहभागी होता येणार आहे. ज्या समाजाला कोणतीही संस्था, महामंडळ किंवा शासकीय विभागाअंतर्गत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील जाती या अमृतच्या लक्षित गटात मोडतात.

स्पर्धेतील रांगोळी आणि निबंधासाठी दोन वयोगट निश्चित करण्यात आले आहेत. १२ ते २१ वर्षे वयोगटासाठी रांगोळीचा विषय ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवणी विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित-शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयात दि.२०/०५/२०२५ रोजी विद्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व ११ वी ऑनलाईन प्रवेश नोंदणी विद्यार्थी मदत कक्षाचे उदघाटन या संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती,स्व.काकु-नाना यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले.इ.१० वी व १२ वी बोर्ड परीक्षेमध्ये



विद्यालयातुन प्रथम,द्वितीय व तृतिय आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासह शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देवून सत्कार करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी.यांनी अध्यक्षिय समारोप करताना विद्यार्थ्यांनी शिक्षणामध्ये सातत्य ठेवून आई-वडीलांचे स्वप्न साकार करावे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रामध्ये करिअर करावे,तसेच आई-वडीलांची सेवा करावी असे मोलाचे विचार व्यक्त केले. गुणवंत ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ स्मारकास नेकनूर ग्रामपंचायत एक महिन्यात जागा देणार

### लेखी आश्वासनानंतर अजय काळे यांचे आमरण उपोषण मागे

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर ग्रामपंचायत समोर उपोषणास बसलेले अजय काळे यांना ग्रामविकास अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर सृष्टी संतोष शिंदे या छोट्या मुलीच्या हाताने नारळ पाणी घेऊन उपोषण सोडले यावेळी सरपंच सौ. अनिता लांडगे, ग्रामविकास अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर



### चार दिवसाच्या लढ्याला अखेर यश

शिवस्मारक बसविण्याच्यासाठी जागेच्या मागणीसाठी चार दिवसापासून ग्रामपंचायत समोर उपोषणास बसलो होतो, त्या लढ्याला अखेर यश आले असून ग्रामपंचायत यांनी जागा देण्याचे मान्य करत एक महिन्यात शिवस्मारक बसविण्यासाठी जागा उपलब्ध करून देतो असे लेखी आश्वासन देऊन चार दिवसांचे उपोषण सोडले, जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्या बद्दल नेकनूर ग्रामपंचायत चे ग्रामविकास सरपंच उपसरपंच, व सर्व सन्माननीय ग्रामपंचायतसदस्य यांचे मन:पूर्व आभार व चार दिवसांच्या उपोषणादरम्यान सहकार्य लाभलेल्या सर्व शिवप्रेमींचे, ग्रामस्थांचे मन:पूर्व आभार- आजयसिंह भारतराव काळे, आंदोलक

## वडमाऊली दहिफळ येथे मोफत मुलांचे बाल संस्कार शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ माऊली येथे शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्था चे संचालक ह.भ प बसवर महाराज यांच्या मार्गदर्शनाने व कुशल नियोजनाने दिनांक २० मे ते २ जून पर्यंत मुलांचे भव्य दिव्य बालसंस्कार शिबिर सुरू आहे. हे शिबिर सर्वांसाठी मोफत आहे या शिबिरात मुलांना वारकरी भजन,किर्तन, भा. ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत कथा,रामायण, तुकाराम गाथा भजन, हरिपाठ, तबला वादन,गायन, हार्मोनियम वादन तसेच मूल्य शिक्षण योग याबरोबरच संगीत आणि विविध कलात्मक गोष्टी शिकवण्यात येणार आहेत .या शिबिरामध्ये मुलांना नाश्ता , दोन वेळा जेवण, फिल्टरचे पिण्याचे पाणी असणार आहे. तरी जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुला मुलींना प्रवेश देऊन या शिबिराचा लाभ घ्यावा असे शिवप्रतिष्ठांची हभप बसवर महाराज यांनी कळवले आहे.

